पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४३८ दिनांक - १७/०६/२०२३**

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर**

## मोक्का गुन्हयातील फरार आरोपीतांना भारती विद्यापीठ पोलीसांकडुन अटक

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुरनं ११९/२०२३ भा.द.वि कलम ३०७,३२३,१४३, १४४,१४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट ४(२५),म पो अ कलम ३७(१)(३)१३५, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३१(ii)३(२)३(४) या गुन्हयातील पाहीजे आरोपीतांचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार शोध घेत असताना पोलीस अंमलदार **हर्षल शिंदे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे** यांना गुन्हयातील मागील पाच महीन्यापासुन फरार असलेले आरोपी रियाज अब्दुल शेख, व अथर्व सणस हे जुना कात्रज बोगदयाजवळ येणार असल्याची माहीती मिळाल्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी कात्रज बोगदयाजवळ सापळा रचुन **आरोपी नामे रियाज अब्दुल रज्जाक शेख, वय २१ वर्षे, रा. मस्के चाळ, संतोषनगर, कात्रज, पुणे २. अथर्व गणेश सणस, वय २० वर्षे, रा. जाधवनगर, भाग २, मांगडेवाडी, कात्रज, पुणे** यांना ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी गुन्हयाचे तपासी अधिकारी श्री.नारायण शिरगावकर, सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांनी सदर आरोपीतांना नमुद गुन्हयामध्ये अटक केली आहे.

नमुद आरोपीत हे गुन्हा केल्यानंतर मागील पाच महीन्यापासुन मिळुन येत नव्हते. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी कशोशीने शोध घेवुन त्यांना अटक केली आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे. श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विजय कुंभार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विजय पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उप निरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार हर्षल शिंदे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, शैलेश साठे, चेतन गोरे, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, अभिजीत जाधव, अवधुत जमदाडे, सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, अशिष गायकवाड, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.